# केसांच्या समस्या आणि त्यांवरील उपाय

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे ‘*’ या चिन्हाने दर्शवली आहेत.)


- मनोगत ६
- ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील ‘एक विद्वान’ यांनी केलेले भाष्य ७
- ‘सूक्ष्म’ या शब्दाच्या संदर्भातील काही संज्ञांचा अर्थ ९
- आध्यात्मिक संज्ञांचा अर्थ ११
- ज्ञान-प्राप्तकर्त्या साधिकांचा परिचय १२

१. कलियुगाचे काळाच्या संदर्भातील वैशिष्ट्य १३
२. केसांचा रंग १३
    २ अ. केस नैसर्गिकरित्या पांढरे होणे १३
    २ आ. वय वाढले तरी केस काळे असणे १४
    २ इ. केस अकाली पांढरे होण्याची कारणे १५
    २ ई. काही जणांचे केस जन्मतःच किंवा लहानपणापासूनच पांढरे असण्यामागील शास्त्र १९
    २ उ. केसांना कलप लावणे या उपायातील धोके २०
    २ ऊ. आयुर्वेदिक उपचार २१
    २ ए. आध्यात्मिक उपायांच्या संदर्भातील अनुभूती २१
३. डोक्यात कोंडा किंवा खवडे होणे २३
४. डोक्याला खाज सुटणे २६
    ४ अ. आध्यात्मिक कारणाची उदाहरणे २६
    ४ आ. डोक्याला खाज सुटणे, या समस्येवर उपचार केल्यानंतर आलेली अनुभूती २७

५. उवा होणे २८
६. डोक्यावरचे केस अकाली जाणे (केस गळणे / टक्कल पडणे) ३१
६ अ. केस गळणे (शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक कारणे) ३१
६ आ. टक्कल पडणे ५०
६ इ. केस गळणे, या समस्येवर उपचार केल्यावर आलेल्या अनुभूती ५२
६ ई. पुरुष आणि स्त्री यांच्या डोक्यावरचे केस जाणे अन् संन्याशाने डोक्यावरचे केस काढणे ५५
७. तोंड, हात आणि पाय यांवर अतिरिक्त लव असणे ५७
८. केसांच्या माध्यमातून होणारे वाईट शक्तींचे त्रास ५९
८ अ. मांत्रिकांनी लढण्यासाठी केसांचा वापर करणे ६०
८ आ. वाईट शक्तींचे त्रास होण्याच्या संदर्भातील केसांची वैशिष्ट्ये ६०
८ इ. काळ्या शक्तीचे ग्रहण आणि प्रक्षेपण ६५
८ ई. मांत्रिकांनी केसांवर आक्रमण करणे ८७
८ उ. वाईट शक्तीने संभोग केला असता जन्मणाऱ्या जीवाचे केस ९१
९. केसांशी संबंधित आध्यात्मिक उपाय, त्यांमागील शास्त्र आणि उपायांमुळे येणाऱ्या अनुभूती ९३
९ अ. आध्यात्मिक उपायांची आवश्यकता ९३
९ आ. विविध आध्यात्मिक उपाय ९४
* विभूती, कापूर आणि गोमूत्र यांचा वापर करणे ९४
* केस धुण्यासाठी सनातन शिकेकाईचा वापर करणे ९८
९ इ. काही आध्यात्मिक त्रासांवरील उपाय आणि त्यांमागील शास्त्र ९९
९ ई. आध्यात्मिक उपाय केल्यामुळे किंवा काळजी घेतल्यामुळे होणारे लाभ १००
९ उ. आध्यात्मिक उपाय केल्यावर साधकांना आलेल्या अनुभूती १०२
१०. केसांशी संबंधित काही आचार १०५
* केस कापतांना होणाऱ्या नादाकडे अनेक वाईट शक्ती आकृष्ट होणे १०५
* शनिवारी दाढी का करू नये ? १०७
* केसांद्वारे काळ्या शक्तीची देवाणघेवाण होऊ नये, यासाठी करावयाच्या काही कृती १०९

# मनोगत

आजकाल केसांविषयी कोणतीही समस्या नसलेला पुरुष किंवा स्त्री पहायला मिळणे दुर्मिळ झाले आहे. केसांत कोंडा होणे, केस अकाली पिकू लागणे, ते गळणे किंवा टक्कल पडणे आदी समस्या सध्या सर्रास आढळतात. या समस्या शारीरिक आणि फारतर मानसिक कारणांमुळेच उद्‌भवतात, असे समजून त्यांवर उपचार केले जातात. हे उपचारही बहुतांश विषमचिकित्सेच्या म्हणजे 'ॲलोपथी'च्या आधारे केले जातात.

आधुनिक विज्ञान केसांच्या समस्यांमागील कारणांचा विचार करतांना केवळ शारीरिक आणि मानसिक कारणांचाच विचार करते. केस मोठ्या प्रमाणात गळणे, स्त्रीचा ओठ आणि हनुवटी यांवर दाढी-मिशांप्रमाणे लव असणे आदी समस्यांमागे आध्यात्मिक कारणे असतात. या ग्रंथात केसांच्या समस्यांमागील आध्यात्मिक कारणांचाही ऊहापोह करण्यात आला आहे.

केस धुण्यासाठी आधुनिक विज्ञानाने निर्माण केलेला एक पर्याय म्हणजे रासायनिक घटक असलेले द्रवरूप साबण (शॅम्पू). 'शॅम्पू'चा आकर्षक सुगंध, विज्ञापने (जाहिराती) इत्यादींना भुलल्यामुळे अनेकांचा कल 'शॅम्पू'चा वापर करण्याकडे असतो. 'शॅम्पू'तील रासायनिक घटकांमुळे त्याचे होणारे दुष्परिणाम मात्र लक्षात घेतले जात नाहीत. येथे आपल्याला ऋषीमुनींनी सांगितलेला आयुर्वेद उपयोगी पडतो. या ग्रंथात स्त्री-पुरुष यांनी केस धुतांना शिकेकाई, रिठे आदी पारंपरिक वनौषधींचा उपयोग करून केस स्वच्छ कसे राखावेत, याचे मार्गदर्शन करण्यासह अन्य आयुर्वेदिक उपचारही सांगितले आहेत.

विज्ञानाच्या अतीप्रभावामुळे सध्या बहुतांश लोकांचे धर्मपालनाकडे दुर्लक्ष होत आहे. प्रस्तूत ग्रंथात केसांसंबंधीचे काही आचार (उदा. शोमवारी किंवा रात्री केस कापू नयेत) आणि त्यांमागील शास्त्र विशद केले आहे. धर्मात सांगितलेल्या आचारांचे पालन केले, तर जिवाला सात्त्विकता मिळण्यासह आध्यात्मिक कारणांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांत घटही होऊ शकते. ग्रंथात दिलेले आयुर्वेदिक उपचार आणि आध्यात्मिक उपाय सर्वांकडून कृतीत आणून केसांच्या समस्यांपासून त्यांची सुटका होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! - **संकलक.**